NATION NEWS मराठी

M/s. S. M. Naik & Associates
LAND SURVEY & GEOTECHNICAL INVESTIGATION.
9821176889
8108151827





महाराष्ट्र मुख्य बातम्या

# रांजनगाव येथे इएसआयसी कडून जागरूकता कार्यक्रमाचे आयोजन

March 25, 2023

**नेशन न्यूज मराठी टीम.**

**पुणे/प्रतिनिधी** – कामगार राज्य विमा महामंडळ (इएसआयसी), उप प्रादेशिक कार्यालय , बिबवेवाडी व आयटीसी लिमिटेड यांच्या वतीने विमाधारक व्यक्ति व नियोक्त्यांसाठी रांजनगाव येथे जागरूकता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात इएसआयसीची कार्यप्रणाली व इएसआयसी मार्फत दिल्या जाणाऱ्या लाभांची माहिती देण्यात आली.

कार्यक्रमाला इएसआयसी उप प्रादेशिक कार्यालय पुण्याचे कार्यालय प्रमुख उप संचालक (प्रभारी) हेमंत कुमार पाण्डेय , उप संचालक सुशीलकुमार श्यामकुंवर आणि आयटीसी लिमिटेडचे महाव्यवस्थापक संदीप शर्मा उपस्थित होते. कार्यक्रम दोन सत्रांमध्ये संपन्न झाला. पहिले सत्र नियोक्त्यांसाठी आयोजित केले होते, ज्यामध्ये शहराच्या विविध भागांमधून आलेले कंपन्यांचे मानव संसाधन व्यवस्थापक व प्रतिनिधि उपस्थित होते. या सत्रात सुशीलकुमार यांनी उपस्थितांना इएसआयसी अधिनियमाच्या अनुपालनासंबंधी सविस्तर माहिती दिली.पाण्डेय यांनी इएसआयसीच्या नवीन उपक्रमांसंबंधी मार्गदर्शन केले.

दुसरे सत्र विमाधारक व्यक्तींसाठी आयोजित केले होते ज्यामध्ये विविध कंपन्यांचे विमाधारक व्यक्ती मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.या सत्रात सुशीलकुमार यांनी पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन च्या माध्यमातून इएसआयसी मार्फत दिल्या जाणाऱ्या वैद्यकीय लाभ, अपंगत्व लाभ, मातृत्व लाभ, आजारपण लाभ इत्यादि संबंधी सविस्तर माहिती दिली तसेच हे लाभ प्राप्त करण्यासाठीच्या प्रक्रियेसंबंधी मार्गदर्शन केले. पाण्डेय यांनी विमाधारक व्यक्तींसाठी इएसआयसी मार्फत सुरु केलेल्या नवीनतम उपक्रमांची माहिती देतानाच कामगारांनी इएसआयसीच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा असे आवाहन केले. संदीप शर्मा यांनी जागरूकता कार्यक्रमाच्या आयोजनाबद्दल इएसआयसीचे आभार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिन फुलारी यांनी केले.



रिजन्सी अनंतम गृह संकुलात बायो गॅस प्रकल्पाचे उद्घाटन



शोभायात्रेत केडीएमसी कडून स्वच्छतेबाबत जनजागृती



निरंकारी सद्गुरुंनी विरार नगरीत दिला एकत्वाचा दिव्य संदेश



आयटीबी बर्लिन व्यापार मेळ्याव्यात महाराष्ट्राच्या पर्यटन विभागाचा सहभाग




ग्रीन सिग्नल' चित्रपट फूटपाथवर राहणाऱ्या मुलीच्या जीवनाचा संघर्ष



रोटरीच्या वतीने कल्याणमध्ये ग्रामीण शेती, जमिनीचे संवर्धन, पर्यावरण विषयावर परिषद




केडीएमसीची एकल वापर प्लास्टिक बंदी आणि कचरा वर्गीकरणासाठी जनजागृती मोहीम



संत निरंकारी मिशनद्वारे आयोजित सामूहिक विवाह सोहळ्यात ५४ जोडपी विवाहबद्ध

**Share via**

© 2020 Nation News Marathi | All Rights Reserved | Designed By - Way For Web